स्थायी समितीच्या **गुरुवार** दिनांक **24–11–2011** रोजी दुपारी **12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 8. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 9. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 10. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 11. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 2. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 3. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 4. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 5. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 134</u> :– जरीपटका बसस्टॉप, मेन रोड येथे बी.ओ.टी. तत्वावर शॉपिंग मॉल बांधण्याकरिता प्राप्त उच्चतम दराची M/s. Multiurban Infra Servive Pvt. Ltd. Nagpur यांची रु. 37.20 Crs. ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन चटई क्षेत्र निर्देशांकात बदल झाल्यास त्याच्या तुलनात्मक दराप्रमाणे प्रिमीयम (Proporcionnate) प्रमाण बद्दतेत कंत्राटदाराकडून प्रिमीयम वसुल करण्यांत यावा या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 135</u> :– वार्ड क्र. 37, वैशाली नगर येथील वैशाली घाटाचे सौदर्यीकरण करण्यास्तव प्राप्त 5 निविदांपैकी मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा 13.00 प्रतिशत ने कमी दरांची रु. 39,15,648/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 136</u> :– आरोग्य विभागा अंतर्गत झोन निहाय गजबजलेले व लहान रस्ते असलेल्या परिसरातील चोकेज निवारन करण्याच्या अनुषंगाने 3000 लि./4000 लि. कमी क्षमतेचे सक्शन कम जेटिंग मशिन प्रथम चरणी एक नग व संबंधीत मशिन चे 3 महिन्याचे Performance समाधानकारक असल्यास पुन्हा दुसरे सक्शन कम जेंटिग मशिन अशी एकूण दोन मशिन खरेदी करण्याकरिता ई–निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 137</u> :– नागपूर शहरातील रस्त्यावरील दिव्यांच्या देखभालीकरीता पुरवठा करणे व पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करणे या करीता

अ) लॅपस्, चोक्स/बॅलॅस्टस, इग्नेटर्स इत्यादी साहित्याचा उत्पादकांमार्फत आवश्यकतेनुसार पुरवठा करणे.

ब) टाईमर्स, कॉन्टॅक्टर्स इत्यादी स्विच गियर्स व इतर आवश्यक साहित्याचा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे व बसविणे. व

क) (अ) तसेच (ब) वर नमूद साहित्याचा उपयोग करुन नागपूर शहरातील पथदिव्यांची (बिओटी तत्वावरील प्रस्तावातील दिवे वगळता इतर पथदिवे) देखभाल व दुरुस्ती करणे या कामाच्या वार्षिक रु. 7.52 कोटी रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा व 'अ' वरील साहित्या नामांकीत उत्पादकांमार्फत व नामपामधे योग्य श्रेणीत नोंदणी झालेल्या अनुभवी अनुज्ञप्ती धारक कंत्राटदारांकडून तीन वर्षाच्या कालावधीकरीता झोननिहाय निविदा बोलवून हे काम करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 138</u> :– नागपूर महानगरपालिका, अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाकरीता 4 नग आयसर 11:10 चेचीसवर फायर टेन्डर फेब्रिकेशन करण्याकरीता स्थायी समिती यांचे ठराव क्रमांक 383 दिनांक 08/11/2010 नुसार मंजूरी मिळाली. त्याप्रमाणे मा. आयुक्त यांचे प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर विभागातर्फे राष्ट्रीय स्तरावर वर्तमान पत्रात जाहीरात क्रमांक 113/पी.आर.दिनांक 22.07.2011 ला देण्यात आली असुन ई–टेन्डरिंग माध्यमातून निविदा मागविण्यात आली असता एकूण 4 निविदाकारोंच तांत्रिक बाबीचे चाचणी केल्यानंतर 4 ही निविदाकारांचे दराबाबत निविदा दर उघडण्यात आले असता

निम्नतम दराचे निविदाकार मेसर्स, जगदंबा इंजिनियरींग ॲण्ड बॉडी बिल्डींग, नागपूर यांचेकडून 4 नग लहान फायर टेन्डर फेब्रिकेशन करुन घेण्यास प्रति नगर रुपये 9,98,250/– प्रमाणे एकूण 4 नग फायर टेन्डर विभागीय स्पेशिफिकेशन प्रमाणे फायर टेन्डर फेब्रिकेशन करुन घेण्यास येणाऱ्या 39,93,000/– च्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ. क्र. | विवरण | प्रमाण | प्रति दर | एकूण निम्नतम निविदा दर |
|---|---|---|---|---|
| 1 | 3000 लिटर पाण्याचे क्षमतेचे विभागीय स्पेशिफिकेशन प्रमाणे पंप, पी.टी.ओ. सह फायर टेन्डर फेब्रिकेशन | 4 नग | 9,98,250/– | 39,93,000/– |

श्री. बाबा मैंदः– मा. अध्यक्ष महोदय, रस्त्यांच्या कामामध्ये पद क्र. 370 या पदामध्ये ज्या फाईली झाल्या आहेत त्या आयआरडीपी रस्त्यांशी संबंधित आहे आणि त्यांचा फार मोठा अमाऊंट होता त्या आजपर्यंत मंजूर झाल्या नाहीत. त्यांचे जुने रेटने एस्टीमेट बनविले होते, आता ईएसआर एटम रेट वाढले आहेत. एक–एक कोटीच्या फाईलमध्ये 35 लक्षाचा अमाऊंट वाढला आहे. दीड महिन्याआधी या फाईल मंजूर झाल्या असता तर 18 ते 20 टक्के बिलोने कामे होवून महापालिकेला फायदा झाला असता. आता 30–35 लक्ष रू. जास्तीचा अमाऊंट वाढला आहे याला जबाबदार कोण?

श्री.गायकवाड(नगरयंत्री):– मा. अध्यक्ष महोदय, एस्टीमेट मंजूर झालेले नाहीत तर जबाबदार कोण राहणार आहे.

श्री. बाबा मैंदः– मा. अध्यक्ष महोदय, एका करोडची फाईल त्यावेळी मंजूर केली असती तर 18 ते 22 टक्के बिलो आली असता तो फायदा झाला असता. आता ही फाईल सव्वा करोडची झालेली आहे. याला जबाबदार कोण? विकासाची कामे होवू द्यावयाची नाहीत असे चाललेले आहे. काल आदेश मिळाले सगळे एस्टीमेट नवीन रेटने तयार करावे तसे आदेश मिळाले आहे. जुन्या रेटने टेंडर काढले तर सरासरी प्रमाणे रेट बदलविता आले असते. 50 लक्षाच्या वरचे आता टी.एस. घेण्यात येणार तर त्याला वेळ लागणार आहे. काम होवू द्यावयाचे नाही आणि काम करावयाचे नाही असा त्याचा अर्थ होतो.

श्री.गायकवाड(नगरयंत्री):– मा. अध्यक्ष महोदय, ज्यांना प्रशासकीय मंजूरी मिळाली नाही त्यांना परत रिवाईज केले जातील. ज्यांना प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे त्याचे एस्टीमेट परत करणार नाही.

अध्यक्षः– ज्याला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे त्याचे रेट ॲनालॅसिस करणार आणि दुसरीकडे याचे रिएस्टीमेट तयार करणार काय?

श्री.गायकवाड(नगरयंत्री):– मा. अध्यक्ष महोदय, रिएस्टीमेट करणार नाही फक्त टीएस घेणार. एका दिवसात टीएस घेवून फाईल आल्या आहेत.

श्री. बाबा मैंदः– मा. अध्यक्ष महोदय, करोडोचे नुकसान महापालिकेचे होत आहे. एका महिन्याआधी फाईली ओके केल्या असता तर महापालिकेचे नुकसान झाले नसते. एका

महिन्याआधी ठेकेदाराने बहिष्कार घातला होता. तेव्हा फिक्स प्रायरिटीच्या सगळया फाईली निघाल्या असता तेव्हा त्यांनी बिलो रेट टाकले होते.

अध्यक्षः– रस्त्यांच्या प्रश्नासंदर्भात मा. सदस्यांनी विचारले याच्याबद्दल प्रशासनाचे संमिश्र मत आहे असे लक्षात येते आणि त्यामुळे या संपुर्ण रस्त्याच्या प्रश्नाच्या बाबतीत प्रशासन उदासिन आहे असे दिसून येते. मागील अनेक दिवसापासून, महिन्यापासून नागपूर शहरातील वर्तमानपत्रामध्ये शहरातील रस्त्यांच्या खड्डयाबद्दल महापालिकेची बदनामी होत आहे. महापालिकेची बदनामी होत असतांना बजेटमध्ये प्रावधान असतांना फाईली होत नसतील याला प्रशासन जबाबदार आहे. मुख्य अभियंता मात्र स्थायी समितीच्या बैठकी गंभीरतेने घेत नाहीत. या संपुर्ण विषयावर उद्या दुपारी 12.30 वाजता मुख्य अभियंतांना स्थायी समितीसमोर पाचारण करावे. स्थायी समितीला यांचेकडून जवाब पाहिजे. शहरातील रस्त्यांची सुस्थिती आणि दुरूस्तीबाबत काय केले आहे आणि त्यांना जबाबदार कां धरण्यात येवू नये. याकरिता स्थायी समिती समोर पाचारण करण्यात यावे.

**ठराव क्रमांक 139** आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास तसेच ही सभा दिनांक 25.11.2011 रोजी दुपारी 12.30 वाजेपर्यंत स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर